महाराष्ट्र पशु व मत्स विज्ञान विद्यापीठ नागपूर नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय (शरिररचनाशास्त्र विभाग)

शेतकरी मित्रांनो गुरे घेतांना नेहमी खालील गोष्टींची खात्री करावी.

१. जनावर देशी आहे की संकरीत

२. जनावरांचे अंदाजे वय (दात, शिंगे वरून)

३. जनावरांचे निरिक्षण करून अंगावर दुखापत वैगेरे नाही याची खात्री करावी.

४. जनावरांच्या कातडीचे केस नैसर्गिकतः चमकदार हवे.

५. डोळे पाणीदार व तेजस्वी हवे.

६. जनावरांच्च्या अंगावर गोचिड/पिसवा वगैरे नाही याची खात्री करावी.

७. जनावरांच्या छातीचा घेर जास्त व नितंब पुष्ठ हवेत.

८. गायी/म्हशी वगैरेमध्ये कासेचा संपूर्ण विकास झाला आहे का हे पाहावे तसेच स्तनांचा आकार जवळपास सारखा हवा

९. कासेला हात लावून दुःख होते का पहावे, दुधांची एक दोन धारा ओढून दुध निर्मेळ आहे याची खात्री करावी

१०. कासेच्या समोर दोन्ही बाजुने पोटाकडे जाणाऱ्या शिरा (मिल्क व्हेन) रूंद व ताठरलेल्या हव्या

११. नरामध्ये अंडकोषाची पुर्ण वाढ झालेली आहे याची खात्री करावी व अंडकोष अंडाशयात फिरणारे आहेत याची खात्री करावी.

१२. जनावरांच्या नाकपुडयांमधला ओठावरील भाग ओलसर हवा कारण सुका भाग जनावर आजारी आहे असे दर्शवितो तसेच नाकामध्ये गाठी वगैरे नाही याची खात्री करावी

१३. जनावरांची जिभ व खुरामध्ये छाले/ जखमा नाहीत याची खात्री करावी.

१४. जनेंनद्रीये स्वच्छ व दुर्गंधीयुक्त स्त्राव विरहीत असावी.

१५. कान टवकारलेले असावे.

१६. जनावरांचा कटीप्रदेश रूंद व साधारण सपाट हवा

१७. नवीन खरेदी केलेल्या जनावराला काही दिवस वेगळे ठेवून नंतर आपल्या गुरांमध्ये सामील करावे